ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 07-01-2022

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-01-07 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2022-01-08 | 2022-01-09 | 2022-01-10 | 2022-01-11 | 2022-01-12 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 6.8 | 8.2 | 25.1 | 23.3 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.7 | 29.1 | 28.7 | 26.9 | 24.9 |
| किमान तापमान (अं.से) | 14.4 | 16.3 | 15.1 | 14.9 | 13.5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 56 | 78 | 83 | 92 | 94 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 40 | 44 | 58 | 65 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 9.0 | 8.0 | 9.0 | 11.0 | 14.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 116 | 135 | 135 | 113 | 101 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 2 | 3 | 5 | 3 |

## हवामान सारांश / चेतावणी:

कामठी तालुक्यामध्ये,भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीयमूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०८ जानेवारी २०२२ते १२ जानेवारी २०२२दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ व दिनांक ०८ जानेवारी २०२२ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता तर दिनांक ०९, १०, ११ व १२ जानेवारी २०२२ रोजी हलका ते मध्यम पाऊस तसेच दिनांक १० व ११ जानेवारी २०२२ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट व गारपीट होण्याची तर १२ जानेवारी २०२२ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

उर्वरित कपाशीची वेचणी पुढील तत्काळ उरकून घ्यावी व शेवटच्या वेचनिनंतर पुढील हंगामात गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कपाशीचे पिक काढून टाकावे.आंतरमशागतीची कामे व कीड आणि रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणी ची कामे १ ते २ स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती लक्षात घेऊनपूर्ण करावी व त्यानंतर पुढे ढकलावीत. पावसाचा अंदाज लक्षात घेता पिकास ओलीत करणे टाळावे. मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेताशेतात काम करता असताना मेघगर्जनेचा आवाज आल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी जनावरांना (शेळी, मेंढी, गाय, म्हैस ई.)मोकळ्या जागेत चारावण्यास सोडणे टाळावे.पाऊस, मेघगर्जना व विजांचा कडकडाट, गारपीट पासून होणारे नुकसान टाळण्यासाठी परिपक्व अवस्थेतील संत्रा, मोसंबी, पेरू फळांची काढणी तसेच बाजारायोग्य भाजीपाला काढणी करावी.उच्च मूल्याच्या पिकाचे गारपीट पासून संरक्षण करण्यासाठी गार प्रतिरोधक जाळ्यांचा (हेल नेट) चा वापर करावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

पाऊस, मेघगर्जना व विजांचा कडकडाट व गारपीट होण्याचा अंदाज लक्षात घेता पिकास ओलीत करणे टाळावे तसेच जनावरांना मोकळ्या जागेत चरावयास सोडणे टाळावे. पावसाचे पाणी शेतात साचुन राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तूर | पावसाचा व गारपीट अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील तूर पिकाची काढणी करून घ्यावी व काढणी आणि मळणी केलेले पिक सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | पाऊस व गारपीट अंदाज लक्षात घेता गहू पिकास ओलीत करणे टाळावे. |
| हरभरा | पाऊस व गारपीट अंदाज लक्षात घेता हरभरा पिकास ओलीत करणे टाळावे. फवारणीची कामे स्वच्छ हवामान परिस्थिती मध्ये करावी. घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये प्रती हेक्टरी २० पक्षीथांबे लावावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस आठ ते दहा पतंग आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात. पिकाचे निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किंवा पिक ४० ते ५० % फुलोरा अवस्थेत असताना सर्वप्रथम वनस्पतीजन्य किंवा जैविक किटकनाशकांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ % किंवा अझाडिरेकटीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून नापस्याक पंपाने फवारणी करावी. पावर स्प्रेयर ने फवारणी करायची असल्यास किटकनाशकाची मात्रा तीन पट करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा इमामेक्तीन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्ल्यूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | उर्वरित कपाशीची वेचणी पुढील तत्काळ उरकून घ्यावी व शेवटच्या वेचनिनंतर पुढील हंगामात गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कपाशीचे पिक काढून टाकावे.कपाशीमध्ये ६० % बोंडे पेक्षा जास्त बोंडे कीड ग्रस्त झाले असल्यास आणि झाडावर नवीन पालवी नसल्यास कपाशीचे पिक काढून रबी पिकाची लागवड करावी. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. |
| मोसबी | ज्या बगिच्यामध्ये किमान २० दिवसाचा ताण पाऊस पडण्याआधी पूर्ण झाला असेल व जुन्या पानांची पानगळ झाली असेल अश्या बगीच्यात पाणी देण्यास सुरुवात करावी व १.० ग्राम जिबरेलिक आम्ल, १.० किलो युरिया व १०० ग्राम कार्बेन्डाझीम १०० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. ज्या बगिच्यामध्ये मागील आंबिया पिकाची काढणी १५ डिसेंबर पर्यंत प्रलंबित झाली असेल व झाडाची पुरेशी पानगळ झाली नसेल किंवा पाने निस्तेज चुरगळलेली झाली नसतील अशा बगिच्यामध्ये क्लोरमेक्वेट क्लोराईड (सीसीसी) २ मिली (हलक्या जमिनीत १.५ मिली) प्रती लिटर पाण्यात मिसळून त्वरित फवारणी करावी व १० ते १२ दिवसाचा ताण कायम ठेवावा. भारी चिकन मातीच्या खोल जमिनीत क्लोरमेक्वेट क्लोराईड (सीसीसी) ऐवजी पॅक्लोब्युट्राझोल२३ ते २५ % तीव्रतेच्या संजीवकाची ३० ते ४० मिली प्रती झाड मात्र ५ लिटर पाण्यात मिसळून मातीद्वारे झाडाच्या आळ्यात द्यावे. गारपिटीमुळे झाडाच्या फांद्या आणि खोडांना जखमा झाल्या असल्यास रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी अशा जखमांवर १ % बोर्डो मिश्रणाचा लेप लावावा. कोळी किडीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल १८.५ ईसी २ मिली किंवा वेटेबल सल्फर ३ ग्राम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. लेबल क्लेम नसलेले परंतु संशोधनाच्या आधारावर प्रभावी कोळीनाशक प्रोपरगाईट ५७ ईसी १ मिली किंवा स्पायरोमेसिफेन २४० एससी ०.३ मिली किंवा फेनाझाक्वीन १० ईसी १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. काळ्या माशीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ०.५ मिली किंवा डायमिथोएट २ मिली प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. प्रौढ उत्पत्ती व ५० टक्के अंडी स्थिती हि फवारणी करिता योग्य वेळ असते कारण या काळात प्रथमावस्था झाडावर उपलब्ध असतात. |

### फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | पाऊस व गारपीट अंदाज लक्षात घेता वांगी पिकास ओलीत करणे टाळावे. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | पाऊस व गारपीट अंदाज लक्षात घेता टमाटे पिकास ओलीत करणे टाळावे. मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवामेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी.सध्याची पावसाची उघडीप संपेपर्यंत टोमॅटो पिकास पाणी देणे टाळावे. पावसाचे पाणी साचले असल्यास तत्काळ निचरा करावे. |
| मिरची | पाऊस व गारपीट अंदाज लक्षात घेता मिरची पिकास ओलीत करणे टाळावे. मिरची पिकावरील रस शोषणाऱ्या किडीच्या व्यवस्थापनाकरिता एरंडी तेलामध्ये सुती कापड भिजवून व त्यानंतर पिळून मिरची पिकावर फिरवून घ्यावे. जेणेकरून या कापडावर रस शोषणाऱ्या किडी (मावा, फुलकिडे, पांढरी माशी व कोळी) चिटकून त्याचे नियंत्रण होईल. फुलकिड्याच्या नियंत्रणासाठी निळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी ४० या प्रमाणात लावावेत. रस शोषणाऱ्या किडीच्या व्यवस्थापनाकरिता वनस्पतीजण्य किट नाशक निंबोळी अर्क ५ टक्के किंवाअॅझाडीराक्टिन ३०० पीपीएम ५०मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यानंतर ३ ते ४ दिवसांनी डायमिथोएट ३० ईसी १४ मिली + सल्फर ८० % डब्लूपी २५ ते ३० ग्राम किंवा फिप्रोनील ५ एससी २० मिली + सल्फर ८० % डब्लूपी २५ ते ३० ग्राम किंवा फेनप्रोप्थ्रीन३० ईसी ३.५ मिली + सल्फर ८० % डब्लूपी २५ ते ३० ग्राम किंवा इथिऑन ५० ईसी ४० मिली + सल्फर ८० % डब्लूपी २५ ते ३० ग्राम यापैकी कोणतेही एक किटकनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. एकच एकच किटकनाशक पुन्हा पुन्हा फवारताना आलटून पालटून वापरावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांना पायखुरी – तोंडखुरी रोगाविरुद्ध लस टोचावी. |
| म्हैस | मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी जनावरांना मोकळ्या जागेत चारावण्यास सोडणे टाळावे. मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी जनावरांना झाडाखाली बांधणे टाळावे. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्ही शेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडा पालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून तळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणी किंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे. जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावर आश्रय घ्यावा.विजांच्या बचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेच जनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासून शक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे. शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी. शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोन व्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडी असलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासून बनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |